पंडित दीनदयाल उपाध्यक्ष शिक्षण संस्था संचलित

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री
## ता. फुलंब्री, जिल्हा- छत्रपती संभाजीनगर – ४३११११

# आचार्यकुल प्रबोधिनी

## वार्षिक अहवाल शैक्षणिक वर्ष २०२२-२३

समिती प्रमुख
**डॉ. महेश थोरात**

प्राचार्य
**डॉ. सुभाष टकले**

## आचार्यकुल प्रबोधिनी समितीचे उद्देश

- संशोधनासाठी प्रेरणा मिळावी म्हणून शोधनिबंधवाचनाचे आयोजन करणे
- नाविन्यपूर्ण काही उपक्रम / योजना माहिती व्हाव्यात या उद्देशाने अभ्यास सहलीचे आयोजन करणे.
- यशवंत प्राध्यापकांचा सत्कार करून त्यांना अभिप्रेरन देणे
- विद्यार्थ्यांना सहकार्य करणे.
- परस्परात सहकार्याची भावना वाढवी यासाठी कर्मचाऱ्यांचे वाढदिवस साजरा करणे.
- संस्थेने आयोजित केलेली सहविचार बैठक (उद्बोधन शिबिर) आणि मासिक ज्ञानसत्रामध्ये उपस्थित राहून ज्ञानार्जन करणे.

## अनुक्रमाणिका


- संशोधन पेपरचे वाचन
- शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी सहल आयोजन
- यशवंत प्राध्यापकांचा सत्कार आणि अभिष्टचिंतन
- पंडित दीनदयाल शिष्यवृत्ती योजना
- संस्था वर्धापन दिन
- सहविचार बैठक
- कार्यक्रमाची छायाचित्रे

## संशोधन पेपरचे वाचन

शैक्षणिक वर्ष 2022-23 मध्ये दर सालाप्रमाणे आचार्यकुल प्रबोधनीच्या वतीने प्राध्यापकांनी शोधनिबंधाचे सादरीकरण केले.

| अ. क्र | दिनांक | प्राध्यापकांची नावे | विभाग | विषय |
|---|---|---|---|---|
| 1 | 01/10/2022 | प्रो. डॉ. राजश्री पवार | मराठी | संत नामदेवांचे आत्मसुख प्राप्ती विषयक अभंग |
| 2 | 19/11/2022 | प्रो. डॉ. पांडुरंग कल्याणकर | अर्थशास्त्र | कोविड-19 महामारीचा जागतिक पर्यावरणावर झालेला परिणाम |
| 3 | 25/2/2023 | प्रो. डॉ. मंजुषा नळगीरकर | समाजशास्त्र | Nutrition Status Of Adolescent Girls In Rural Area |
| 4 | 28/2/2023 | . डॉ. संदीप जगताप | फिजिकल डायरेक्टर | Need Of Physical Activity To Maintain Health And Fitness In Presence Scenario |
| 5 | 3/3/2023 | डॉ. सुरेश मुंडे | हिंदी | साहित्य सिनेमा और समाज |
| 6 | 6/3/2023 | डॉ. दत्तात्रेय येदले | हिंदी | भारतीय ज्ञान परंपरा गाय गोमाता की प्रासंगिकता |
| 7 | 8/3/2023 | डॉ. संजीव कुमार पांचाळ | मराठी | संत कवयित्रीच्या अभंगातील स्त्रीत्वाची जाणीव |


# संशोधन पेपरचे वाचन





प्रो. डॉ. राजश्री पवार




प्रो. डॉ. पांडुरंग कल्याणकर




प्रो. डॉ. मंजुषा नळगीरकर




डॉ महेश थोरात




डॉ. दत्तात्रेय येदले




डॉ. संदीप जगताप




डॉ. संजीव कुमार पांचाळ

## शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी सहल आयोजन

शैक्षणिक वर्ष 2023-24 मध्ये महाविद्यालयाचे मूल्यांकन NAAC या संस्थेच्या माध्यमातून होणार असल्याकारणाने, त्याचप्रमाणे देवगिरी महाविद्यालयाला NAAC चा A++ दर्जेचा ग्रेड प्राप्त झाल्यामुळे आपल्या महाविद्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांना NAAC संबंधीची योग्य माहिती मिळेल या उद्देशाने सर्वानुमते या वर्षाची शैक्षणिक सहल देवगिरी महाविद्यालयात काढण्याचे ठरले. देवगिरी महाविद्यालयाचे NAAC कॉर्डिनेटर डॉ. विष्णू पाटील आणि प्राचार्य प्रोफेसर डॉ. अशोक तेजनकर सर यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क करून १२ नोव्हेंबर २०२२ रोजी जाण्याचे ठरले.

12 नोव्हेंबर 2022 रोजी देवगिरी महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी गेल्यानंतर प्रथमतः उप प्राचार्य डॉ. अनिल अर्धड यांची भेट घेऊन बैठक कक्षामध्ये बसण्याची व्यवस्था करण्यात आली. त्यानंतर प्राचार्य प्रो. डॉ.अशोक तेजनकर आणि आय क्यू एसी कॉर्डिनेटर डॉ. विष्णू पाटील यांचे आगमन झाले. सर्वांचा परिचय करून देण्यात आला व NAAC मूल्यांकनात देवगिरी महाविद्यालयास उत्कृष्ट ग्रेट मिळाल्यामुळे त्यांचे अभिनंदन करून प्राचार्यांचा सत्कार करण्यात आला.

आय क्यू एसी कॉर्डिनेटर डॉ.विष्णू पाटील आणि प्राचार्य प्रो.डॉ. अशोक तेजनकर यांनी सर्वांना NAAC विषयी सखोल मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे सर्व प्राध्यापकांनी प्रत्येकाच्या विभागानुसार भेट देऊन NAAC संबंधीची माहिती घेतली.

नक्कीच या अभ्यास सहलीचा उपयोग आम्हाला आमच्या महाविद्यालयाचे NAAC करण्यासाठी झाला.

# शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी सहल आयोजन- देवगिरी महाविद्यालय




प्राचार्य डॉ. सुभाष टकले देवगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक तेजलकर यांचा सत्कार करत असताना




आय क्यू एसी कॉर्डिनेटर डॉ.विष्णू पाटील आणि प्राचार्य प्रो.डॉ. अशोक तेजनकर सर्वांना NAAC विषयी सखोल मार्गदर्शन karaताना



अभ्यास सहली दरम्यान ग्रुप फोटो देवगिरी महाविद्यालय



डिपार्टमेंट ऑफ कॉमर्स देवगिरी महाविद्यालय भेट देत असताना

## यशवंत प्राध्यापकांचा सत्कार आणि अभिष्टचिंतन

- डॉ. गणेश कुलकर्णी यांची ऑल इंडिया लायब्ररी असोसिएशनच्या सदस्यपदी निवड त्यामुळे आचार्य प्रबोधनीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.
- डॉ. नितीन माळेगावकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील वाणिज्य शाखेमध्ये पीएचडी डिग्री मिळवली त्यामुळे आचार्य प्रबोधनीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.
- डॉ.अश्विन रांजणीकर, डॉ. सुरेश मुंडे, डॉ. पांडुरंग कल्याणकर यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अभ्यास मंडळावर निवड झाल्यामुळे आचार्य कुलप्रबोधनीच्या वतीने सत्कार करण्यात आला.
- डॉ. अश्विन रांजणीकर यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या प्रश्नपत्रिका सेटर म्हणून निवड झाल्याबद्दल आचार्य प्रबोधिनीच्या वतीने सत्कार करण्यात आला.







महाविद्यालयातील यशवंताचा सत्कार करत असताना माननीय श्री हरिभाऊजी बागडे नाना

# पंडित दीनदयाल शिष्यवृत्ती योजना

आचार्य कुलप्रबोधनीच्या माध्यमातून शैक्षणिक वर्ष 2022- 23 मध्ये पंडित दीनदयाल शिष्यवृत्तीसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी 43000 रुपयाचे योगदान दिले. या रकमेच्या माध्यमातून महाविद्यालयातील 98 विद्यार्थ्यांना त्यांची प्रवेश फीस व परीक्षा फीस भरण्यासाठी आर्थिक मदत झाली.

पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था संचलित,

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

ता. फुलंब्री जि. औरंगाबाद.

पंडित दीनदयाल शिष्यवृत्ती योजना

शैक्षणिक वर्ष २०२२-२३

| अ.क्र | नाव | चेक क्रमांक | दिनांक | रक्कम | |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्राचार्य डॉ. टकले सुभाष रामकिसन | २६९६९९ | २/३/२०२३ | ४०००/- | AANPT2?5H |
| २ | डॉ. कल्याणकर पांडुरंग मारोतराव | २६३४३८ | १/३/२०२३ | ३०००/- | ALIPK0410F |
| ३ | डॉ. पवार राजश्री पंढरिनाथ | २७८७२७ | १/३/२०२३ | ३०००/ | AKDPP1747Q |
| ४ | डॉ. नळगीरकर मंजुषा मोतीराम | २६७७३७ | १/३/२०२३ | ३०००/ | ADEPN9183E |
| ५ | प्रा. पांडे विजय रामराव | २३७९४५ | १/३/२०२३ | ३०००/ | AKPPP1746R |
| ६ | डॉ. लोमटे रामसिशन वसंतराव | २७१००१ | १/३/२०२३ | ३०००/ | ACTPL5129J |
| ७ | डॉ. येडले दत्तात्रय लक्ष्मण | २८०९६८ | १/३/२०२३ | ३०००/ | ABTPY5854C |
| ८ | डॉ. मुंढे सुरेश माधवराव | २३७८५१ | २/३/२०२३ | ३०००/ | AXJPM9178P |
| ९ | डॉ. पांचाळ संजीवकुमार सुर्यकांत | २१८५६८ | १/३/२०२३ | ३०००/ | BGTPP5931M |
| १० | डॉ. रांजणीकर अश्विन पुरुषोत्तम | २८०६४२ | २/३/२०२३ | ३०००/ | AMKPR5668R |
| ११ | डॉ. थोरात महेश भाऊसाहेब | २५४२७६ | १/३/२०२३ | ३०००/ | AJWPT9626L |
| १२ | डॉ. जगताप संदीप जगन्नाथ | ३०३२०१ | ३/३/२०२३ | ३०००/ | ALXPJ6169R |
| १३ | डॉ. मालेगावकर नितीन पंढरिनाथ | २९८८०१ | १/३/२०२३ | ३०००/ | BSYPM6063L |
| १४ | डॉ. कुलकणी गणेश दिनकरराव | ०३२८०५ | ६/३/२०२३ | ३०००/ | AFCPT3489D |
| | एकूण | | | ४३०००/- | |

डॉ. महेश भाऊसाहेब थोरात
समिती प्रमुख

नोट: वरील सर्व चेक हे चिखली बँकेत जमा करण्यात आले आहेत.

## संस्था वर्धापन दिन

संस्था वर्धापन दिनानिमित्त ज्या कार्यक्रमाचे आयोजन केलेले होते त्यामध्ये दिनांक 12 डिसेंबर 2022 रोजी महाविद्यालयातील सीनियर क्लर्क श्री प्रेम चव्हाण यांनी "संत सावता माळयांचा कर्मयोग" याविषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष टकले यांनी केला तसेच इतर सर्व प्राध्यापक कर्मचाऱ्यांनी नेमून दिलेली जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडली.









श्री प्रेम चव्हाण यांनी "संत सावता माळयांचा कर्मयोग" याविषयी मार्गदर्शन करत असताना

## सहविचार बैठक : 23, 24 व 25 सप्टेंबर 2022

शैक्षणिक वर्ष 2022-23 मध्ये आचार्य प्रबोधिनीच्या वतीने सहविचार बैठकीचे आयोजन संत सावता गुरुकुल मध्ये दिनांक 23, 24 व 25 सप्टेंबर 2022 रोजी करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या परिसरातच सहविचार बैठकीचे आयोजन असल्यामुळे महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांवरती विशेष जबाबदारी सोपविण्यात आली होती.

सुकाणू समितीचे सदस्य म्हणून डॉ.महेश थोरात यांची निवड करण्यात आली.नाव नोंदणी आणि सत्रप्रमाणे उपस्थितीची नोंद ठेवणे याची जबाबदारी श्री दयानंद कांबळे व श्री प्रेम चव्हाण यांच्याकडे देण्यात आली. भोजन व्यवस्थेची जबाबदारी डॉ. गणेश कुलकर्णी यांच्याकडे होती. हॉलची स्वच्छता श्री विनोद तुपे, श्री रमेश जगधने, श्री जयराम जाधव, श्री रत्नाकर जाधव यांच्याकडे होती. व्हिडिओ शूटिंगची जबाबदारी डॉ. दत्तात्रय येडले यांच्याकडे होती. प्रोजेक्टर आणि लॅपटॉपची व्यवस्था डॉक्टर नितीन माळेगावकर यांच्याकडे सोपविण्यात आली. समारोप सत्राचा कार्यक्रम महाविद्यालयाकडे असल्याकारणाने सूत्रसंचालन डॉ. संजीवकुमार पांचाळ, सुविचार डॉ. संदीप जगताप प्रार्थना डॉ. सुरेश मुंडे, पाहुण्यांचा परिचय आणि स्वागत डॉ. अश्विन रांजणीकर, आभार डॉ. रामकिसन लोमटे यांच्याकडे जबाबदारी सोपविण्यात आली होती. व सर्वांनी यशस्वीरित्या जबाबदारी सांभाळली.

दिनांक 23 सप्टेंबर 2022 रोजी सायंकाळी 7.00 वाजता सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नोंदणी आणि आगमन झाले त्यानंतर संस्थेचे सचिव माननीय श्री श्यामसुंदरजी नाईक यांनी "संस्थेची सिद्धांतिक भूमिका" याविषयी मार्गदर्शन केले

दिनांक 24 सप्टेंबर 2022 रोजी नेहमी ठरल्याप्रमाणे पहाटे ५.३० वाजेपासून खेळ, कवायती शाखा योगा, चहा, नाश्ता, स्नान आटोपल्यानंतर वैचारिक सत्रांची सुरुवात आ. श्री श्यामसुंदर नाईक यांच्या उद्घाटनपर भाषणातून झाली.

| अ. क्र | दिनांक | प्रमुख वक्ते | अध्यक्ष | विषय | आयोजक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 23/09/2022 | श्री श्यामसुंदरजी नाईक | | "संस्थेची सिद्धांतिक भूमिका" | रामेश्वर महाविद्यालय वाघोळा |
| 2 | 24/09/2022 | उदय देवळाणकर | श्री प्रमोद सोनवणे | शेती परंपरा आणि पर्यावरण | संत तुकाराम विद्यालय शिंगी |
| 3 | 24/09/2022 | श्री सुहास लंके | श्री दाभाडे | आनंदाची डोही | संत गाडगेबाबा आश्रम शाळा अंजनडोह |
| 4 | 24/09/2022 | श्री सुभाष गायकवाड | | सायबर क्राईम | त्र्यंबकेश्वर विद्यालय गेवराई |
| 5 | 24/09/2022 | सायंकाळी साडेसात वाजता संगीत सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते<br>दीप निर्वाण आणि निर्वाण षटक सहविचार बैठकाची सांगता होत असे. | | | |
| 6 | 25/09/2022 | सौ मेघना बडजात्या | श्री वायाळ | कोविड नंतरचे दुष्परिणाम | जुनेश्वर विद्यालय वरुड |
| 7 | 25/09/2022 | आपले दैनंदिन कामातील नवोपक्रम व उनिवा | | | |
| 8 | 25/09/2022<br>समारोप सत्र | श्री सुहास शिरसाट नगराध्यक्ष फुलंब्री | मा. श्री हरिभाऊ जी बागडे नाना | | श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री |
| | | समारोपत्रास मा. श्री शामसुंदर जी नाईक<br>मा.श्री प्राचार्य डॉ. सर्जेराव जी ठोंबरे<br>मा. श्री प्राचार्य डॉ. प्रदीप जबदे<br>भारतीय शिक्षण मंडळाचे पूर्णवेळ कार्यकर्ते निखिलजी कुहिते. इत्यादी मान्यवरांनी समारोपत्रास उपस्थित राहून मार्गदर्शन केले. | | | |

# आचार्यकुल प्रबोधनीच्या वतीने आयोजित कार्यक्रमाचे छायाचित्र



संस्थेचे सचिव मा. श्री शामसुंदरजी नाईक मार्गदर्शन करत असताना



शिक्षणाधिकारी श्री. साबळे मार्गदर्शन करत असताना



शेती परंपरा आणि पर्यावरण याविषयी मार्गदर्शन करत असताना उदय देवळाणकर




आनंदाचे डोही या विषयावर सुहास लंके मार्गदर्शन करत असताना



सायबर क्राईम याविषयी मार्गदर्शन करत असताना पोलीस निरीक्षक श्री सुभाष गायकवाड




कोविड 19 नंतरचे दुष्परिणाम या विषयावर मार्गदर्शन करत असताना सौ मेघना बडजात्या



आपले दैनंदिन कामातील  नवोपक्रम व उनिवा याविषयी महाविद्यालय यातील
सर्व प्राध्यापक चिंतन करत असतानाची बैठक




समारोप सत्राचा अध्यक्षीय समारोप करत असताना माननीय हरिभाऊ जी बागडे नाना



समारोप कार्यक्रमात मार्गदर्शन करत असताना प्राचार्य डॉ. सर्जेराव ठोंबरे




समारोप कार्यक्रमात मार्गदर्शन करत असताना प्राचार्य डॉ. प्रदीप जबदे




पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जयंतीच्या निमित्ताने मार्गदर्शन करत
असताना डॉ.रामकिसन लोमटे




भारतीय शिक्षण मंडळाचे पूर्णवेळ कार्यकर्ते श्री निखिल कुहीते यांचा सत्कार करत
असताना प्राचार्य डॉ. सर्जेराव ठोंबरे







सहविचार बैठकीस उपस्थित सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी




श्री राहुल मिसाळ यांची महाविद्यालयाच्या सीडीसी या समितीवर नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करत असताना माननीय नाना

समिती प्रमुख
**डॉ. महेश थोरात**